# मनगटातील धमक ओळखण्याची गरज

## गायकवाड : भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्काराचे वितरण




सोलापूर : भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्कारप्राप्त डॉ. राघवेंद्र कोथूर, प्रा. अनिल अंकुलकर, प्रशांत माणिकशेटे, दीपक कलढोणे, बलराजसिंह बायस, शीतल जमगे यांच्यासोबत प्रा. शंकरराव सोळुंके, सुशील गायकवाड, डॉ. रणजित गांधी, प्रदीप पंडित.

**सोलापूर, ता. १७ :** सामान्यातील सामान्य माणूस भरीव कार्य करू शकतो. प्रत्येकाच्या मनगटात कर्तृत्वाची धमक असतेच. गरज असते ती धमक वेळेत ओळखण्याची, असे मत मध्य रेल्वेचे वरिष्ठ मंडल परिचलन प्रबंधक सुशील गायकवाड यांनी आज व्यक्त केले.

स्व. भाऊसाहेब गांधी यांच्या जयंतीनिमित्त ऐ. प. दि. जैन पाठशाळा सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्काराचे वितरण आज वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात झाले. पाठशाळेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी अध्यक्षस्थानी होते.

प्रा. शंकरराव सोळुंके, पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. वरिष्ठ महाविद्यालयाचा पुरस्कार वालचंद कला महाविद्यालयाचे डॉ. राघवेंद्र कोथूर व वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. अनिल अंकुलकर यांना मिळाला. कनिष्ठ महाविद्यालयाचा पुरस्कार जैन गुरुकुलचे प्रशांत माणिकशेटे व दीपक कलढोणे यांना मिळाला. सेवाभावी शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे बलराजसिंह बायस व कुंथलगिरी येथील देशभूषण कुलभूषण विद्यालयाचे शीतल जमगे यांना मिळाला.

गायकवाड म्हणाले, १९७२ मध्ये संस्थेची धुरा हाती घेतलेल्या भाऊसाहेब गांधी यांनी शैक्षणिक विस्ताराचे मोठे कार्य करून सर्वांसाठी सर्वांसाठी प्रेरणास्थान झाले आहेत. प्रा. सोळुंके यांनी भाऊसाहेब गांधी यांच्या सोबत केलेल्या कामाच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सतीश काशीद व प्रा. मनीषा निरगुडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एन. बतीन यांनी आभार मानले.